सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/CET/प्रवेशपत्र/6510 दिनांक: 28/09/2025

**महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानुसार सन 2025-26 करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) संदर्भात**

## महत्वाची सूचना

सन 2025-26 करिता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांमधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी बार्टी, पुणे मार्फत सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येत आहे.

दिनांक 17/09/2025 रोजी प्रसिद्ध केलेल्या घोषणापत्रकानुसार **संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) सोमवार दिनांक 29/09/2025 रोजी व मंगळवार दिनांक 30/09/2025 रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक 26 सप्टेंबर 2025 च्या प्रेस नोट नुसार मध्य महाराष्ट्र, कोकण व विदर्भ या भागामध्ये भारतीय हवामान विभागाकडून झालेल्या पूर्व अनुमानानुसार (IMD) मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली असून अनेक जिल्ह्यांना ऑरेंज व रेड अलर्ट देण्यात आलेले आहेत. या पार्श्वभूमीवर दिनांक 29 व 30 सप्टेंबर 2025 रोजी बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांकरिता बार्टीमार्फत घेण्यात येणारी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व प्रशिक्षण सामयिक चाचणी परीक्षा **(Common Entrance Test)** नियोजित वेळापत्रकानुसारच होईल परंतु पूरसदृश्य परिस्थितीमुळे जे विद्यार्थी सदर परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण सामायिक चाळणी परीक्षा **(Common Entrance Test)** पुन्हा घेण्यात येईल. संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण सामायिक चाळणी परीक्षेस अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत सामायिक चाळणी परीक्षेचे वेळापत्रक बार्टी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

स्वाक्षरी/-
(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा सदस्य, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती.**